भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2025 ◐ EH 033009

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून सहा महिने वापरणे बंधनकारक आहे.

मुद्रांक रुपये 500/-

16392 12 NOV 2025

Mr. Thaddeus Kohli
Shankar Sheth road, Gultekdi Pune 411037

Self

दूरध्वनी -020- 26326477,

मो. 7588659294 शासकीय कार्यालयासमोर / न्यायालयासमोर प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी मुद्रांक कागदाची आवश्यकता नाही शासन आदेश दि. 1/07/2004 नुसार.

Adv. Farzana Shaikh
Upper Bibvewadi,
Pune-411 037.

वरिष्ठ कोषागार अधिकारी
पुणे
07 NOV 2025
मुद्रांक लिपीक
कोषागार

NOTARY
ADV. BHUPENDRA S. GOSAVI
HVL. PUNE MAH.
REGD. NO. 15508
EXP. DATE 19/11/2029
GOVERNMENT OF INDIA

**ई-मान्यता प्रणाली नमुना 2 साठी प्रतिज्ञापत्र**

**मी श्री. थॅडीयस कोहली** मुख्याध्यापक म्हणून **सेंट झेविअर स्कूल** या शाळेत (UDISE -) 27251600913 शाळेचा पूर्ण पत्ता **नगर भूमापन क्रमांक 39, गुलटेकडी, शंकरशेठ रोड, पुणे 411 037** या ठिकाणी कार्यरत असून सत्यकथन करतो की मी मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.) पुणे जिल्हा परिषद, पुणे या कार्यालयाकडे **स्व मान्यता (नमुना 2 आदेश)** कालावधी २०२५ **पासून** २०२८ पर्यंत मिळवणेसाठी online ई मान्यता प्रणालीद्वारे **https://emanyatapune.org/** या संकेतस्थळावर प्रस्ताव दाखल केले आहे.

2) सदर शाळा व संस्था हि कोणतीही अनधिकृत शाळा अथवा वर्ग चालवीत नाही.

3) सदर शाळा व संस्था हि सर्व शासकीय नियमाचे पालन हे जबाबदारीपूर्वक करीत आहे.

4) सदर शाळा हि अशी कोणतीही अनुचित कृती करत नाही की, ज्यामुळे शाळेबद्दल पालक, विद्यार्थी अन्य तत्सम व्यक्ती कडून कोणत्याही प्रकारच्या तक्रारी उद्भवतील.

5) शाळेत आवश्यक अभिलेखे रजिस्टर ठेवले असून ते विहित नमुन्यात आहेत व अद्ययावत आहेत. तपासणी अधिकारी यांना तपासणी साठी उपलब्ध आहेत.

6) शाळा परवानगी दिलेल्या ठिकाणीच भरत आहे.

7) शाळा मान्यता अथवा संस्था व्यवस्थापन यांचे संदर्भात न्यायप्रविष्ट बाब नाही याचीही मी हमी देत आहे. भविष्यात या संदर्भात विसंगती अथवा चुकीची व खोटी कागदपत्रे दिल्याचे निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापक म्हणून माझी व संस्थेची राहील याची मला जाणीव आहे व होणा-या कायदेशीर परिणामास मी जबाबदार राहीन सदर शाळा हि **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम 2011 मधील नियम नियमांचे पूर्तता करीत आहे.**

स्थळ : पुणे

दिनांक : २१/११/२०२५

अध्यक्ष/सचिव स्वाक्षरी- Mascarenhas sj

नाव : Fr. Agnelo Mascarenhas S.J.

शिक्का

मो.न. : 9168223875

मुख्याध्यापक स्वाक्षरी Thaddeus Kohli

नाव : THADDEUS KOHLI

PRINCIPAL
St. Xavier's School, Pune

ST. XAVIER'S SCHOOL, PUNE
Gultekdi, Shankar Sheth Road, Pune-411037

शिक्का

मो.न. : 9168466516

NOTARY ★ GOVERNMENT OF INDIA ★
ADV. BHUPENDRA S. GOSAVI
HVL. PUNE MAH.
REGD. NO. 15508
EXP. DATE 19/11/2029

BEFORE ME

Adv. BHUPENDRA S. GOSAVI
NOTARY
GOVERNMENT OF INDIA
HAVELI. PUNE MAH.

Noted & Registered
At.Sr.No. 053/2025
Date 25/11/2025

सदर दस्ताबाबत भविष्यात काही वाद/तंटा इ. उपस्थित झाल्यास आम्ही उभयता पक्षकार व्यतिशः जबाबदार राहू/असे.

The Poona Catholic Educational Association (Pvt) Ltd
A CHRISTIAN RELIGIOUS MINORITY SCHOOL
St. Xavier's School
Survey No. 39, Gultekdi, Shankar Shet Road, Pune – 411037
UDISE No.: 27251600913

शाळेस मान्यता मिळण्यासाठी, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 यांच्या अनुसूचीमध्ये विहित केलेली मानके व प्रमाणके यांच्या अनुपालनासंबंधात

# प्रतिज्ञापत्र

* प्रमाणित करण्यात येते की, शाळेने या अर्जासोबत जिल्हा शिक्षण माहिती पध्दतीनुसार आधार सामुग्रीच्या नमुन्यात देखील माहिती सादर केली आहे.
* प्रमाणित करण्यात येते की, जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी वेळोवेळी देण्यास भाग पाडलेले असे अहवाल व माहिती सादर करण्याची शाळा मान्यतेच्या शर्तीची सातत्याने परिपूर्ती करण्याबाबत व शाळेच्या कामकाजातील त्रूटी दुर करण्याबाबत खातरजमा करण्यासाठी समुचित प्राधिकरण किंवा जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी दिलेल्या अशा सूचनांचे पालन करण्याची हमी शाळा देत आहे.
* प्रमाणित करण्यात येते की, समुचित प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याला तपासणीसाठी शाळा खुली असेल.
* प्रमाणित करण्यात येते की, या अधिनियमाच्या अंमलबजावणी संदर्भातील शाळेचे सर्व अभिलेखे जिल्हा शिक्षण प्राधिका-याने वा समुचित प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास तपासणीसाठी केव्हाही उपलब्ध असतील आणि केंद्र सरकार/राज्य शासन/स्थानिक संस्था किंवा संसद/राज्य विधान सभा/पंचायत किंवा यथास्थिती महानगरपालिका यांच्या प्रती असलेली तीची किंवा त्यांची बंधने पुर्ण करणारे प्रशासन यांना सहाय्यभूत ठरण्यासाठी आवश्यक असेल अशी सर्व माहिती शाळा पुरविल.

Mascarenhas SJ

**Fr. Agnelo Mascarenhas S.J.**
अध्यक्ष / व्यवस्थापक
शाळा व्यवस्थापन समिती.

स्थळ – **पुणे**
दिनांक **२१.११.२०२५**

020-29972597
8149830102
stxavierspune37@gmail.com
www.stxavierspune.com